वाचले- १) जाहीरात क्र.८७७,वायसीएमएच/७/कावि/१३६३/२०१७ दि.१८/१०/२०१७

२) निवड समितीने शिफारस केलेली निवड व प्रतिक्षा यादी

३) मा.आयुक्त यांनी वैद्यकिय अधिक्षक यांना प्रतिक्षा यादीतील व walk in Interview ने पदे भरणेस दि. १७/१०/२०१७ च्या मंजुर प्रस्तावान्वये दिलेले अधिकार.

४) मा.वैद्यकिय अधिक्षक यांचेकडील दि.०४ /१२/२०१७ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/१८४६/२०१७
दिनांक ०४/१२/२०१७

विषय-यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयात एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता विविध पदांवर नियुक्ती आदेश देणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले विविध पदे एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता भरणेकरीता उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर विविध पदांकरीता आलेल्या सर्व उमेदवारांची लेखी परिक्षा दि.०६/११/२०१७ व दि.०७/११/२०१७ रोजी घेणेत आलेली आहे. त्याप्रमाणे गुणवत्ता यादी तयार करून निवडलेल्या विविध १० पदांचे उमेदवारांना एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता नियुक्ती देणेकामी शिफारस केलेली आहे.

उपरोक्त निवडयादीप्रमाणे निवड समितीने शिफारस केलेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/१६८७/२०१७ दि.१३/११/२०१७ अन्वये स्टाफनर्स या पदांना दि.१३/११/२०१७ ते दि.१२/०५/२०१८ पर्यंत सहा महिने, आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/१६८९/२०१७ दि.१३/११/२०१७ अन्वये एम.एस.डब्ल्यु, एक्स-रे टेक्निशियन व ब्लडबँक टेक्निशियन या पदांना दि.१३/११/२०१७ ते दि.१२/०५/२०१८ पर्यंत सहा महिने, आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१६९५/२०१७ दि.१६/११/२०१७ अन्वये ए.एन.एम, डायलेसिस टेक्निशियन, व फर्मासिस्ट या पदांना दि.१६/११/२०१७ ते दि.१५/०५/२०१८ पर्यंत सहा महिने, व आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१६९८/२०१७ दि.२०/११/२०१७ अन्वये ब्लॅडबँक कौन्सीलर, लॅब टेक्निशियन व डाटाएंट्री ऑपरेटर या पदांना दि.२०/११/२०१७ ते दि.१९/०५/२०१८ पर्यंत सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या विहित कालावधीत जे उमेदवार रूजू झालेले नाहीत. अशा रिक्त जागेवर निवडसमितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सबब सोबतच्या प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेल्या उमेदवरांना नेमणुक देणेस मी वैद्यकिय अधिक्षक यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय पिंपरी -४११०१८ मला मा.आयुक्त यांनी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून रिक्त जागांवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची त्यांच्या नावापुढे दर्शविणेत आलेल्या मानधनावर सहा महिने कालावधीसाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून नेमणुक करणेत येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u>**

१) मानधन सेवा कालावधीत आपणांस उपस्थित दिवसांचे एकवट मानधन विहीत केलेनुसार देणेत येईल. म.न.पा.च्या इतर कर्मचा-यांना लागू असणा-या इतर सुविधा, हक्क व आर्थिक लाभ आपणांस मिळणार नाहीत.

२) आठवडयातून फक्त एक दिवस रूग्णालयाच्या सोईनुसार साप्ताहिक सुट्टी राहील.सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी म्हणजेच ज्या सुट्टीच्या दिवशी ओ.पी.डी. बंद असते त्या दिवसाची सुट्टी उपभोगता येईल. मानधन कालावधीत दिड महिन्यासाठी १ याप्रमाणे एकुण ४ किरकोळ रजा देय राहतील.

३) कामकाजाची वेळ रूग्णालयाच्या वेळापत्रकानुसार व रुग्णालयीन कामकाजाच्या सोयीनुसार राहील.

४) मानधनावरील पदाचे काम करताना आपणांकडून सर्वांना निप:क्षपातीपणाची वागणूक मिळणे आवश्यक आहे. रुग्णालयीन कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपल्यावर राहील.

५) मानधनावरील नियुक्त केलेल्या आपल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्व सुचना कार्यालयास देणे आपणांवर बंधनकारक राहील. अन्यथा आपणास १ महीन्याचे मानधन मनपा कोषागरात भरावे लागेल.

६)आपले कामकाज समाधानकारक नसलेस अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्व सुचना न देता आपल्याला मानधनावरील आपल्या पदाच्या जबाबदारीतुन मुक्त करण्यात येईल.

७)मानधनावरील नियुक्ती नोकरी नाही. त्यामुळे वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. याबाबत हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

८)मानधनावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

९)सदर कर्मचारी यांनी कामावर येताना-जाताना उपस्थितीसाठी बायोमेट्रिक प्रणालीचा वापर करणे बंधनकारक राहील. तसेच हजेरी मस्टरवरती रोजच्या रोज स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. ज्या दिवसाचा थंम्ब (दोन्ही वेळेस) व स्वाक्षरी नसलेस त्या दिवसाचा पगार अदा केला जाणार नाही. व त्याबाबतची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०) सदर नेमणुक स्थायी समितीचे मान्यतेच्या अटीस अधीन राहुन देणेत येत आहे.

११)कामावर वेळेवर हजर राहुन ओळखपत्र व गणवेश प्रदान करणे तसेच विभाग इन्चार्ज/नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१२)मानधन कर्मचा-यांना रविवार व्यतिरीक्त शनिवार अर्धा दिवस सुट्टी मिळणार नाही. ज्या कर्मचा-यांचे शनिवारी अर्धा दिवस ओ.पी.डी. असलेस ती बंद झाल्यावर उर्वरित अर्ध्या दिवसाचे कामकाज वैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रणात कामकाज करावे.

१३) मानधन कर्मचा-यांना रजा ही विभाग प्रमुख यांच्या परवानगी शिवाय घेता येणार नाही.अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करण्यात येईल.

१४)नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधाने कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा राहणार नाही. अशी सेवा एकुण (Aggregate) कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरुपाची नेमणुक देता येणार नाही व तसा कोणताही हक्क राहणार नाही.

१५)रुजु झाल्यावर ७ दिवसाचे आत बँक ऑफ बदोडा पीसीएमसी शाखा मध्ये खाते उघडुन त्याचा क्रमांक व पॅनकार्डची झेरॉक्स संबधीत पगार लिपीक (चाणक्य कार्यालय) यांचेकडे देण्यात यावेत.

१६) नियुक्तीच्या वेळी मुळ कागदपत्रे सादर न केल्यास अथवा कागदपत्रे वैध नसल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१७) आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत रुजु न झालेस सदरचा आदेश रद्द करण्यात येईल.

**वैद्यकिय अधिक्षक**
**यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

**प्रति,**

**श्री/श्रीम.------------------------------------**

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

**प्रत,**

१) लेखा विभाग

२) सर्व्हर रुम

३) मेट्रन कार्यालय/ओ.टी. विभाग

४) राजीव गांधी जीवनदायी योजना

५) संबधीत पगार लिपीक

**२/- माहीतीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी .**

D/Gaikwad sir/मानधन/मानधन भरती एप्रिल २०१७ दुरुस्ती दि.19-4-2017

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८
## यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

प्र पत्र 'अ'

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयात तात्पुरत्या स्वरूपात विविध पदे निवड समितीने शिफारस केलेल्या विविध पदाचे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश
(नेमणुक कालावधी दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८)

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती पदनाम | एकूण मानधन र. रूपये | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.घोडके प्रतिक्षा मधुकर | अनुसुचीत जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २ | श्रीम.पंडीत स्नेहल प्रभाकर | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३ | श्रीम.शिंदे नेहा सॅमसन | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ४ | श्रीम.महाले पुजा प्रकाश | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ५ | श्रीम.जगताप अश्विनी महादेव | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ६ | श्रीम.नाईक भावना राजेश | खुला | स्टाफनर्स | १८०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ७ | श्रीम.शेख रेश्मा एस | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ८ | श्रीम.माळवे निलम उत्तम | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ९ | श्रीम.मकासरे कांचन अशोक | खुला | स्टाफनर्स | २००००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १० | श्रीम.तोरडे रश्मी सुनिल | खुला | स्टाफनर्स | १८०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ११ | श्रीम.दौंडकर भारती शिवाजी | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १२ | श्रीम.माळी माय्याका आण्णाप्पा | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १३ | श्रीम.कानकुटे निता दासराव | अनसुचित जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | श्रीम.हुंडे विद्या सुरेश | अनसुचित जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १५ | श्रीम.अथानी प्रियांका महादेव | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १६ | श्रीम.ढाकणे वर्षा वाल्मिक | वि.भा.भ.ज.ड (एन.टी.डी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १७ | श्रीम.माने भाग्यश्री आत्माराम | भ.ज.क (एन.टी.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १८ | श्रीम.वाघमारे रेश्मा राजेद्र | खुला | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| १९ | श्रीम.आंधारे अनिता कृष्णांथ | खुला | स्टाफनर्स | २००००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २० | श्रीम.पिसुरे जयश्री शिवलिंग | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २१ | श्रीम.बहिराम दुर्गा यशवंत | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २२ | श्रीम.खरवडे मनिषा रामदास | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २३ | श्रीम.राऊत पुजा ज्ञानेश्वर | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २४ | श्री.वारूळे कुणाल उत्तमराव | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २५ | श्रीम.बोरडे ज्योती प्रमोद | इतर मा. वर्ग ओ.बी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २६ | श्रीम.टिळक दिपमाला मच्छिंद्र | अनुसुचित जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २७ | श्रीम.खाबडे रोहिणी रविंद्र | अनुसुचित जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २८ | श्रीम.गायकवाड भाग्यश्री सोपान | अनुसुचित जाती (एस.सी) | स्टाफनर्स | १८०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| २९ | श्रीम.गावित निर्मला विजय | अनुसुचितजमाती (एस.टी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३० | श्रीम.वसावे अंजना रमेश | अनुसुचितजमाती (एस.टी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३१ | श्रीम.पावरा अश्विनी प्रताप | अनुसुचितजमाती (एस.टी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३२ | श्रीम.बहिराम अलका पोपट | अनुसुचितजमाती (एस.टी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३३ | श्री.गिरी निता वसंतराव | वि.जा.भ.ज.ब (एन.टी.बी) | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३४ | श्रीम.माळशिकारे भाग्यश्री बापुराव | भ.ज.क (एन.टी.सी) | स्टाफनर्स | १८०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३५ | श्रीम.पोरे अश्विनी दिलिप | भ.ज.क (एन.टी.सी | स्टाफनर्स | १६०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | श्रीम,दळवी भाग्यश्री मनोहर | खुला | ए.एन.एम | १३०२८/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १५/०५/२०१८ |
| ३७ | श्रीम.गायकवाड किसन गणपत | अनुसुचित जाती (एस.सी) | एम.एस.डब्ल्यु | १३०२८/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३८ | श्री.गौरखेडे ललित लिलाधर | अनुसूचित जाती (एस.सी) | एक्स-रे टेक्नि. | १३०२८/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ३९ | श्रीम.शेख मुबिना रफिक | खुला | ब्लडबँक टेक्नि. | १३०२८/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ४० | श्री.देशमुख मयुरी रविंद्र | खुला | ब्लडबँक टेक्नि. | १३०२८/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १२/०५/२०१८ |
| ४१ | श्रीम.कांबळे सुमित्रा अभिमन्यु | खुला | लॅब टेक्निशियन | १५०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १९/०५/२०१८ |
| ४२ | श्री. राजेगवे संताजी व्यंकटराव | वि.जा.भ.ज.सी(एन.टी.सी) | लॅब टेक्निशियन | १५०००/- | दि. ०४/१२/२०१७ ते दिनांक १९/०५/२०१८ |
| ४३ | श्री.ठोके यशपाल निवृत्ती | अनुसुचित जाती (एस.सी) | डाटाएंट्री ऑपरेटर | १३०२८/- | दि. २७/११/२०१७ ते दिनांक १९/०५/२०१८ |
| ४४ | श्रीम.गायकवाड आम्रपाली बापु | अनुसूचित जाती (एस.सी) | ब्लॅडबॅक कौन्सीलर | १७०००/- | दि. २७/११/२०१७ ते दिनांक १९/०५/२०१८ |

आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/१८४६ /२०१७.
दिनांक ०४ /१२/२०१७ चे लगतचे प्रपत्र अ.

वैद्यकिय अधिक्षक
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८